# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

विषय :- प्र.स.क्र. १ ते ०५ कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी भुमिगत केबल टाकणेकामी मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांनी रस्ता खोदाईपोटी भरलेल्या रक्कमेतून रस्ता खोदाई न केलेली रक्कम संस्थेस परत करणे बाबत.

संदर्भ :-
१) इकडील जा.क्र./भिनिशमनपा/बांध./४८०८ दि. २६/१२/२०२२ रोजीचे मुदतवाढ आदेश
२) मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांचे दि. २० जानेवारी २०२३ रोजीचे पत्र
३) मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांचे दि. ०३ मार्च २०२३ रोजीचे पत्र
४) मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांचे दि. १० एप्रिल २०२३ रोजीचे पत्र
५) मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांचे दि. ११ सप्टेंबर २०२३ रोजीचे पत्र
६) इकडील जा.क्र./भिनिशमनपा/बांध./१०८२ दि. ०६/०३/२०२४ रोजीचे पत्र
७) मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांचे दि. १५/०३/२०२४ रोजीचे पत्र

मे. सादर,

मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांना प्र.स.क्र. ०१ ते ०५ अंतर्गत एकुण २३ कि.मी. लांब फायबर ऑप्टीकल केबल अंथरणे कामी रस्ता खोदाई परवानगी निर्गमित करण्यांत आली असुन, सदर कामाची मुदत दि. १५ मे २०२२ पर्यंत होती. सदर २३ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी संस्थेने १० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या खोदाईचे काम पुर्ण केले आहे. उर्वरीत १३ कि.मी. लांबीच्या रस्ता खोदाईसाठी संस्थेने केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांना मा. आयुक्त सो. यांचे दि. २२/१२/२०२२ रोजीच्या मंजुरीने दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत मुदतवाढ संदर्भ क्र. ०१ नुसार देण्यांत आली होती. मात्र संस्थेने उर्वरित १३ कि.मी. पैकी ०५ कि.मी. चे काम पुर्ण करुन उर्वरीत ०८ कि.मी. लांबीचा रस्ता नागरिकांच्या विरोधामुळे करता येणे शक्य न झाल्यामुळे १५ मे २०२३ पर्यंत रस्ता खोदाई कामी मुदतवाढ अपेक्षीलेली होती. सदर मुदतवाढ करिता मंजुरि करिता सादर केले असता, तत्कालीन मा. आयुक्त सो. यांनी विषयांकीत प्रकरणी चर्चेकरिता बोलावले असता, सदर रस्ता संस्थेमार्फत खोदल्यास पावसाळ्यापूर्वी रस्ता दुरुस्तीचे काम होणे शक्य नसल्याने पावसाळ्यानंतर संस्थेस नव्याने अर्ज करुन रस्ता खोदाई मुदतवाढ करिता प्रस्ताव सादर करणेकामी तत्कालीन मा. आयुक्त सो. यांनी मौखीक निर्देश दिले होते.

संस्थेचे संदर्भ क्रं. ०३, ०४ व ०५ चे पत्र या कार्यालयात प्राप्त झाले असुन, सदर पत्रान्वये संस्थेने न खोदाई केलेले रस्ता खोदाई शुल्क परत करणेकामी मागणी केलेली आहे. तरी संदर्भ क्रं. ०६ च्या पत्रान्वये संस्थेस रस्ता खोदाई व परवानगी घेऊन न केलेल्या रस्ता खोदाई बाबतची तपशिलवार माहिती (नकाशासह) सादर करणेकामी पत्राव्दारे कळविण्यांत आलेली आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्रं. ०७ च्या पत्रान्वये संस्थेने खालीलप्रमाणे माहिती सादर केलेली आहे.

| प्र.स.क्रं. | रस्त्याचा प्रकार | परवानगी दिलेली रस्त्याची लांबी (मिटर) | प्रत्यक्ष खोदाई केलेली रस्त्याची लांबी (मिटर) | शिल्लक लांबी (मिटर) | दर (प्रति मिटर) | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ व २ | डांबरी रस्ता | ४८०० | ५१५ | ४२८५ | १०,०००/- | ४,२८,५०,०००/- |
| | एच.डी.डी. रस्ता | १४२ | १६८ | -२६ | १०,०००/- | (-) २,६०,०००/- |
| | कच्चा रस्ता | ३६०० | ११९० | २४१० | ३,६५९/- | ८८,१८,१९०/- |
| ३ | डांबरी रस्ता | २००० | १४७५ | ५२५ | १०,०००/- | ५२,५०,०००/- |
| | एच.डी.डी. रस्ता | ६० | ५० | १० | १०,०००/- | १,००,०००/- |
| | कच्चा रस्ता | १५०० | ० | १५०० | ३,६५९/- | ५४,८८,५००/- |
| ४ व ५ | डांबरी रस्ता | २४०० | २१०० | ३०० | १०,०००/- | ३०,००,०००/- |
| | एच.डी.डी. रस्ता | ७२ | ० | ७२ | १०,०००/- | ७,२०,०००/- |
| | कच्चा रस्ता | १८०० | ० | १८०० | ३,६५९/- | ६५,८६,२००/- |
| | | परत करावयाची एकुण रक्कम रु. | | | | ७,२५,५२,८९०/- |

संस्थेने प्र.स.क्रं. ०१ व ०२ करिता रक्कम रु. ६,२५,९२,४००/-, प्र.स.क्रं. ०३ करिता रक्कम रु. २,६०,८८,५०/- व प्र.स.क्रं. ०४ व ०५ करिता रक्कम रु. ३,१३,०६,२००/- असे एकुण रक्कम रु. ११,९९,८७,१००/- इतके शुल्क मनपा खात्यात जमा केलेले आहेत. उपरोक्त अहवालानुसार संस्थेने रस्ता खोदाईपोटी भरलेल्या रक्कमेतून रस्ता खोदाई न केलेल्या रक्कम रु. ७,२५,५२,८९०/- इतकी रक्कम परत मिळणेकामी मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन उपरोक्त अहवाल सादर करण्यांत आलेला आहे.

सदर प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५१ व कलम १५२ च्या संयुक्तपणे मंजुरी मिळणेकामी सविनय सादर.

ठराव क्रं. :- ५१५ दिनांक :- ९/९/२०२४

मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांना प्र.स.क्र. ०१ ते ०५ अंतर्गत एकुण २३ कि.मी. लांब फायबर ऑप्टीकल केबल अंथरणे कामी रस्ता खोदाई परवानगी निर्गमित करण्यांत आली असुन, सदर २३ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी संस्थेने १० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या खोदाईचे काम पुर्ण केले आहे. मात्र संस्थेने उर्वरित १३ कि.मी. पैकी ०५ कि.मी. चे काम पुर्ण करुन उर्वरीत ०८ कि.मी. लांबीचा रस्ता नागरिकांच्या विरोधामुळे करता येणे शक्य झाले नाही. मे. ऐअरटेल, टेलिसोनिक नेटवर्क लि. यांचे दि. १५/०३/२०२४ रोजीचे पत्रान्वये

संस्थेने प्रत्यक्ष खोदाई केलेली रस्त्याची लांबी व शिल्लक राहिलेली रस्त्याच्या लांबी बाबत उपरोक्त तक्त्यानुसार रस्ता खोदाई न केलेल्या रक्कम रु. ७,२५,५२,८९०/- इतकी रक्कम परत मिळणेकामी मागणी केलेली आहे.

ठराव क्र.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५१ व कलम १५२ नुसार वरिल नमुद संस्थेची रक्कम परत करणेकामी मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.

**प्रस्तावना:**

**विषय :- खालील कामांना प्रशासकिय ठरावांची मंजूरी मिळणे बाबत.**

प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील खालील नमूद केलेली कामे अपुर्ण कामे पुर्ण करण्याचे काम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना" अंतर्गत प्रस्तावीत केलेली आहेत. तरी सदरची कामे प्रशासकिय मान्यतेसाठी व निधी मागणीसाठी मा. जिल्हाधिकारी सो, ठाणे. यांचेकडे पाठविणेकामी प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी पूर्व मान्यता दिलेली आहे. पुढील कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकिय ठराव करणेकामी मंजूरीस्तव सविनय सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.३ मध्ये दत्ता काबळे यांच्या घरापासून ते वाणी यांच्या घरापर्यत गटार बनविणे बाबत. | ९९५७४५/- |
| २ | वॉर्ड क्र.३ मध्ये अपना नगर येथे मेन रोडच्या बाजूला गटर बनवून स्लॅब टाकणे | ९९७८२४/- |
| ३ | वॉर्ड क्र.३ काबळे यांच्या घरापासून रोडच्या बाजूला पी.सी.सी.करुन पेव्हर ब्लॉक बसविणे | ९९२८९७/- |
| ४ | वॉर्ड क्र.३ गायत्री नगर येथे डोंगरावर पाथवेज बनविणे | ९८९५४३/- |
| ५ | वॉर्ड क्र.३ मध्ये भिम नगर मुख्य रोडच्या बाजूला गटार बनवून स्लॅब बनविणे | ९९०८८७/- |
| ६ | वॉर्ड क्र.३ मध्ये गायत्रीनगर येथे हॉल च्या समोर पेव्हर ब्लॉक बसविणे | ९८९५७९/- |
| ७ | वॉर्ड क्र.३ वॉर्ड क्र.३ मध्ये गौतम नगर ते दुर्गा नगर मेन रोड लगत गटर बनवून स्लॅब टाकणे बाबत. | ९९२६४५/- |
| ८ | वॉर्ड क्र.३ मध्ये सिध्दार्थ नगर येथे लोक वस्तीमध्ये पाथवेज बनवून पेव्हर ब्लॉक लावणे | ९८६५३९/- |
| ९ | वॉर्ड क्र.३ मध्ये वानखेडे यांच्या घरापासून ते भोसले यांच्या घरापर्यत पाथवेज बनवून गटार बनविणे | ९९४५७४/- |
| १० | वॉर्ड क्र.३ मध्ये भिम नगर हॉल च्या बाजूला उंच भागात आर.सी.सी. वॉल बांधून पेव्हर ब्लॉक बसविणे | ९९७८४९/- |
| | **एकुण** | **९९३३००९/-** |

**ठराव क्र:-** ५७६ **दिनांक** ९ / ९ /२०२४

"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना" या शासन निधी अंतर्गत सदर कामाचे रक्कम रुपये रु. **९९३३००९/-** मात्रचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरीता मा. जिल्हाधिकारी सो,

ठाणे. यांचेकडे पाठविणेकामीच्या प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक तसेच अति. आयुक्त यांनी शिफारसी केलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम.सी.ओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग- २) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) व (1ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार वरिल नमूद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय ठरावाची मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि. महानगरपालिका, भिवंडी

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :-** वार्ड क्र.२० मधील आदेश्वर डाईंग ते रश्मी टेक्सटाईल्स पर्यंत नाला बनविणे.

**लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारना योजना अंतर्गत** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वार्ड क्र.२० मधील आदेश्वर डाईंग ते रश्मी टेक्सटाईल्स पर्यंत नाला बनविणे. रु.१,६२,३९,९८३/- मात्रची ई निविदा सुचना क्र.२०४/२०२३-२४ वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) देऊन या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन बी-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता एकुण पात्र २ निविदा प्राप्त झाल्या असुन, पात्र २ निविदाकारांचा तैलनिक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| **१** | **चंडिका कंन्ट्रक्शन** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.०९० टक्के कमी दराने** |
| २ | हिंदुस्थान इन्टरप्रायसेस | अंदाजपत्रकिय दराने |

चंडिका कंन्ट्रक्शन, भिवंडी यांनी दिलेला देकार न्युनतम असुन अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.०९० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.१,५४,१३,३६८/- येत आहे.

चंडिका कंन्ट्रक्शन, भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.०९० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.१,५४,१३,३६८/- (अक्षरी एक कोटी चोपन्न लाख तेरा हजार तीनशे अठुसष्ठ मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय मान्यता या मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(कृ.मागे पहा)

ठराव क्र. ५१७

दिनांक :- ९/९/२०२४

**लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारना योजना अंतर्गत** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वार्ड क्र.२० मधील आदेश्वर डाईंग ते रश्मी टेक्सटाईल्स पर्यंत नाला बनविणे. कामी सर्वात कमी दराचे निविदाकार चंडिका कंन्ट्रक्शन, भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.०९० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.१,५४,१३,३६८/- (अक्षरी एक कोटी चोपन्न लाख तेरा हजार तीनशे अठुसष्ठ मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वि. वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.२० मधील आदेश्वर डाईंग ते रश्मी टेक्सटाईल्स पर्यंत नाला बनविणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **चंडिका कंन्ट्रक्शन, भिवंडी** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वि. वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :-** भिवंडी शहरातील वार्ड क्र.२० मध्ये साठेनगर येथे संरक्षण भिंत बनविणे, ओपन जीम, खेळण्याचे साहित्य व बेंचेस बसविणे.

लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारना योजना अंतर्गत भिवंडी शहरातील वार्ड क्र.२० मध्ये साठेनगर येथे संरक्षण भिंत बनविणे, ओपन जीम, खेळण्याचे साहित्य व बेंचेस बसविणे. रु.३७,८७,६०८/- मात्रची ई निविदा सुचना क्र.२०४/२०२३-२४ वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) देऊन या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन बी-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता एकुण पात्र २ निविदा प्राप्त झाल्या असुन, पात्र २ निविदाकारांचा तैलनिक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| १ | **चंडिका कंन्ट्रक्शन** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३.०१० टक्के कमी दराने** |
| २ | सुजित बाळासाहेब खरात | अंदाजपत्रकिय दराने |

चंडिका कंन्ट्रक्शन, भिवंडी यांनी दिलेला देकार न्युनतम असुन अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३.०१० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.३६,७३,६०१/- येत आहे.

चंडिका कंन्ट्रक्शन, भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३.०१० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.३६,७३,६०१/- (अक्षरी छत्तीस लाख त्र्याहत्तर हजार सहाशे एक रु. मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय मान्यता या मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(कृ.मागे पहा)

ठराव क्र. ५१८

दिनांक :- ९/९/२०२४

लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारना योजना अंतर्गत भिवंडी शहरातील वार्ड क्र.२० मध्ये साठेनगर येथे संरक्षण भिंत बनविणे, ओपन जीम, खेळण्याचे साहित्य व बेंचेस बसविणे. कामी सर्वात कमी दराचे निविदाकार चंडिका कंन्ट्रक्शन, भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३.०१० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.३७,८७,६०८/- (अक्षरी छत्तीस लाख त्र्याहत्तर हजार सहाशे एक रु. मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वि. वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.२० मध्ये साठेनगर येथे संरक्षण भिंत बनविणे, ओपन जीम, खेळण्याचे साहित्य व बेंचेस बसविणे. कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **चंडिका कंन्ट्रक्शन, भिवंडी** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वि. वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

**प्रस्तावना :-**

**विषय :- प्रभाग समिती क्रं.१ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे. (वार्षिक निविदा सन २०२४-२५)**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३४,९५,५००/- करिता ई-निविदा सुचना क्र.३९/२०२४-२५, टेंडर नं.१०३६९९६७ दिनांक ०९/०८/२०२४ ते १६/०८/२०२४ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. दि. १९/०८/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली असुन या कामी २ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदा छाननी अंती लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक २६/०८/२०२४ रोजी दु. ४.०३ मि.उघडण्यात आली असून एकूण पात्र २ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | **मे.झा.पी.ॲण्ड कंपनी, उल्हासनगर.** | **अंदाजपत्रकीय दराने** | **३४,९५,५००.००** |
| २ | मे.साई एस.एस.के.इन्फ्रास्ट्रक्चर, कल्याण | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.० टक्के जादा दराने** | ३५,६५,४१०.३६९ |

वरील पैकी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी, उल्हासनगर. यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने रक्कम रु.३४,९५,५००/- (रुपये चौतीस लाख पंचानवद हजार पाचशे मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ५१९ **दिनांक :-** ९/०९/**२०२४**

मे.झा.पी.ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने रक्कम रु. ३४,९५,५००/- (रुपये चौतीस लाख पंचानवद हजार पाचशे मात्र) च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.१ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.झा.पी.ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय:- प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे.**

प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे.कामी रक्कम रु.३४,९७,०६८/- मात्र प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक १९/०७/२०२४ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास ठराव क्रं.४८३ दिनांक १४/०८/२०२४ अन्वये आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु.३४,९७,०६७/- ई-निविदा सुचना क्र.४१/२०२३-२४ (१०६७७१२) दि.०९/०८/२०२४ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.१९/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी पात्र झालेल्या निविदा खालीलप्रमाणे आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.९९% कमी दराने** |
| २ | मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.४५% कमी दराने |

वरील पैकी **मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल** यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा ०.९९% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.३४,**६२,४४७/-** (रु.चौतीस लाख बासष्ट हजार चारशे सत्येचाळीस मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ४५२० दिनांक :- ९/०९/२०२४

मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा ०.९९% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.३४,६२,४४७/- (रु.चौतीस लाख बासष्ट हजार चारशे सत्येचाळीस मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे. कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.श.महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :-** प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्तयांची मास्टीक मध्दतीने दुरुस्ती करणे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक मध्दतीने दुरुस्ती करणे. रक्कम रु.३४,९८,७६२/- मात्रच्या कामाकरीता ई निविदा सुचना क्र.४६/२०२४-२५ वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन बी-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता एकुण पात्र २ निविदा प्राप्त झाल्या असुन, पात्र २ निविदाकारांचा तैलनिक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| १ | **साई एस एस के इन्फ्रास्ट्रक्चर** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.९९० टक्के कमी दराने** |
| २ | झा.पी.अ‍ॅण्ड कंपनी | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.४५० टक्के कमी दराने |

साई एस एस के इन्फ्रास्ट्रक्चर, म्हारळ गाव, कल्याण यांनी दिलेला देकार न्युनतम असुन अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.९९० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.३४,६४,१२५/- येत आहे.

साई एस एस के इन्फ्रास्ट्रक्चर, म्हारळ गाव, कल्याण यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.९९० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.३४,६४,१२५/- (अक्षरी चौतीस लाख चौसष्ट हजार एकशे पंचवीस मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय मान्यता या मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(कृ.मागे पहा)

ठराव क्र. ५२७ दिनांक :- ९/९/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक मध्दतीने दुरुस्ती करणे. कामी सर्वात कमी दराचे निविदाकार साई एस एस के इन्फ्रास्ट्रक्चर, म्हारळ गाव, कल्याण यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.९९० % कमी दराने म्हणजेच रु.३४,६४,१२५/- (अक्षरी चौतीस लाख चौसष्ट हजार एकशे पंचवीस मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वि. वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक मध्दतीने दुरुस्ती करणे रक्कम रु.३४,६४,१२५/- (अक्षरी चौतीस लाख चौसष्ट हजार एकशे पंचवीस मात्र) या कामी सर्वात कमी दराचे निविदाकार साई एस एस के इन्फ्रास्ट्रक्चर, म्हारळ गाव, कल्याण यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वि. वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :- प्रभाग समिती क्र.2 अंतर्गत टेमघर नाका ते भादवड रोड पर्यंत व टेमघर नाका ते टेमघर रोड अंतर्गत रस्ता दुरुस्ती करणे.**

उपरोक्त विषयानुसार प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत टेमघर नाका ते भादवड रोड पर्यंत व टेमघर नाका ते टेमधर रोड अंतर्गत रस्ता येथे महानगर गॅस लि यांनी २०५० मी. लांबीत डांबरीकरण रस्ता व ५७५ मी.लांबीत पेव्हरब्लॉक एकुण २६२५ गॅस पाईपलाईन टाकणे कामी रस्ता खोदाई करणे करिता टोरंट पॉवर कंपनी, भिवंडी यांनी मनपा कडुन परवानगी मागितली असता संबंधित कंपनी कडुन रस्ता खोदाई रकक्म रु.३,३४,६८,७५०/-शुल्क आकारण्यात आलाआहे. त्यानुसार . महानगर गॅस लि. यांनी रक्क्मरु.३,३४,६८,७५०/- मनपा फंडात जमा केलेआहे. महानगर गॅस लि .यांनी गॅस पाईप लाईन टाकणे करिता खोदलेल्या रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यकआहे. अन्यथा रस्ता दुरुस्त न केल्यास वाहतुकीस व नागरिकांनाये-जा करण्यास त्रास होऊन नागरिकांच्या रोषास सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरील रस्ता दुरुस्ती करिता रक्कम रु.९९,९१,८९९/- इतका खर्च होणार आहे. मा.आयुक्तसो. यांचे जा.क्र.भिनिशमनपा/आयुक्त् कार्या./१७०/२०२३ दि.०२/११/२०२३ नुसार महानगरपालिकेस प्राप्त होणा-या महसुली उत्पन्ना पैकी रस्ता खोदाई शुल्कातुन किमान ५०% शुल्क रक्कम त्यासंबंधित रस्त्यांच्या दुरुस्ती कामी राखुन ठेवण्या बाबतआदेशात नमुद केलेआहे.

परंतु जा.क्र.भिनिशमनपा/आयुक्त कार्या./१०९/२०२३ दि.१२/०९/२०२३ नुसार महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती भक्कम करण्यासाठी मा.आयुक्तांची विशेष परवानगी घेतल्याशिवाय महानगरपालिका निधीतुन कोणतेही भांडवली काम हाती घेऊ नयेत. केवळ अत्यावश्यक देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेण्यता यावीत असे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. सदरचे काम अत्यावश्यक असल्याने काम करणे गरजेचेआहे. त्याअनुषंगाने विषयांकीत कामास रक्कम रुपये ९९,९१,८९९/- (अक्षरी नव्याण्णव लाख एक्याण्णव हजार आठशे नव्याण्णव मात्र ) इतका खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त सो यांनी दि.१२/०३/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ५२२ दिनांक :- ९/९/२०२४

प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत टेमघर नाका ते भादवड रोड पर्यंत व टेमघर नाका ते टेमघर रोड अंतर्गत रस्ता दुरुस्ती करणे. कामाचा रक्कम रुपये ९९,९१,८९९/- (अक्षरी नव्याण्णव लाख एक्याण्णव हजार आठशे नव्याण्णव मात्र ) इतका खर्चाचा प्रस्ताव सादर केला असुन शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य,प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत टेमघर नाका ते भादवड रोड पर्यंत व टेमघर नाका ते टेमघर रोड अंतर्गत रस्ता दुरुस्ती करणे.प्रशासकीय मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका